पोलीस ठाणे कळंब उस्मानाबाद

(3)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** उस्मानाबाद **P.S.(ठाणे):** कळंब

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0525 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 20/12/2023 20:46

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
   **Date From (दिनांक पासून):** 20/12/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 20/12/2023
   **Time Period (कालावधी):** पहर 3
   **Time From (वेळेपासून):** 09:55 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 09:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 20/12/2023 **Time (वेळ):** 20:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 040

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/12/2023 20:46 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 0.1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय, कळंब , जवळील शिंदे यांचे हाटेलचे पाठी,कळंब

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सुनिल सुरेश मुळीक

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | खोंदला,कळंब,कळंब ,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | खोंदला,कळंब,कळंब ,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9822954148

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अनिल शिवराम सुरवसे | | | 1. हमु कल्पना नगर कळंब,कळंब , कळंब ,उस्मानाबाद,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|

Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
दिनांक 20.12.2023

मी सुनिल सुरेश मुळीक, वय 38 वर्षे व्यवसाय- शेती व वाळु वाहतुक, रा.खोंदला, ता.कळंब जि.धाराशिव मोबाईल नंबर 9822954148.

काल दिनांक 19.12.2023 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव येथे हजर राहुन तक्रार दिली होती. त्यामधील हकिगत अशी की, "मी वरील गावाचा राहणार असुन कुटूबासह राहतो. माझ्याकडे सोनाली कंपनीचा ट्रॅक्टर क्रमांक एमएच 44 डी 5505 हा असुन मी शेती व ट्रॅक्टर मधुन वाळु वाहतुकीचा व्यवसाय करीत आहे.

तहसिलदार कार्यालय, कळंब येथील तहसिलदार यांचे वाहनावर अनिल सुरवसे हे चालक असुन ते नेहमी आमचे गावाकडे येवुन माझा ट्रॅक्टर आडवुन तु वाळु वाहतुक करतोस, परंतु मला महिन्याला हप्ता देत नाहीस असे म्हणुन ते ट्रॅक्टर आडविला की, माझ्याकडून 5,00/- रुपये, 1,000/- रुपये व 2,000/- रुपये घेत होते. त्यांचे मागणीप्रमाणे मी त्यांना काही वेळा माझ्या मोबाईलवरून फोन पे द्वारे पौसे पाठविलेले आहेत. चालक अनिल सुरवसे हे मला महिन्याला 15,000/- रुपये हप्ता दे ! म्हणजे तुझा ट्रॅक्टर आडवित नाही असे म्हणत होते. त्यावेळी मी त्यांना साहेब वाळुचा व्यवसाय एवढा चालत नाही. त्यामुळे मला तुम्हाला महिन्याकाठी 15,000/- रुपये हप्ता दयायला परवडत नाही असे म्हणत होतो.

काल दिन्नांक 18.12.2023 रोजी चालक अनिल सुरवसे यांनी मला त्यांचा मोबाईल 9096206028 वरुन माझा मोबाईल क्रमांक 9822954148 वर मला फोन करुन कळंब येथे बोलावुन घेतले. त्यावरुन मी दुपारी कळंब येथे येवुन चालक अनिल सुरवसे यांची भेट घेतली. तेंव्हा ते मला तु तुझ्या ट्रॅक्टरमधुन वाळु वाहतुक करतोस, परंतु मला हप्ता देत नाहीस, तु महिन्याला 15,000/- रुपये दे ! नाहीतर तुझा ट्रॅक्टर तहसिल कार्यालय, कळंब येथे आणुन तुझ्या ट्रॅक्टरवर वाळु वाहतुक केल्याची कारवाई करेल असे म्हणाले. तेंव्हा मी त्यांना साहेब जुन महिन्यापासुन वाळुची वाहतुक बंद आहे. त्यामुळे मला तुम्हाला महिन्याला 15,000/- रुपये हप्ता दयायला परवडत नाहीत असे म्हणलो असता ते मला तु मला महिन्याला 15,000/- रुपये हप्ता दिल्याशिवाय तुझा ट्रॅक्टर चालु देणार नाही असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना साहेब आत्ता तर माझ्या जवळ काही पौसे नाहीत काय असेल ते उद्या पाहु असे म्हणालो. तेंव्हा ते मला उद्या रात्री तहसिल कार्यालय, कळंब येथे येवुन मला फोन करुन माझी भेट घे असे म्हणाले. त्यानंतर मी त्यांच्यापासुन निघुन गावी गेलो.

तहसिलदार कार्यालय, कळंब येथील तहसिलदार यांचे वाहनावरील चालक अनिल सुरवसे यांनी माझ्याकडे मागणी केलेले 15,000/- रुपये ही कोणतीही शासकीय फिस नसुन ती लाचच असल्याची माझी खात्री झाली आहे. मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही.

आज रोजी मी तहसिलदार कार्यालय, कळंब येथे जावुन तहसिलदार यांचे वाहनावरील चालक अनिल सुरवसे यांची भेट घेवुन त्यांना माझ्या ट्रॅक्टर मधुन वाळु वाहतुक करुन देण्यासाठी व त्यावर कोणतीही कारवाई न करण्यासंदर्भाने बोलणार आहे. त्याकरीता त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी" वगैरे मजकुरची तक्रार म्हेत्रे साहेब, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव यांच्याकडे दिली व त्यांनी माझी तक्रार पोशि/ शेरकर यांना प्रतिवेदीत केली. त्यावरुन पोशि/ शेरकर यांनी माझी तक्रार संगणकावर टंकलिखीत करुन त्यांची प्रिंट काढली. त्यानंतर त्यांनी माझी संगणकावर टंकलिखीत केलेली तक्रार व मी तोंडी सांगितलेली तक्रार एकच असल्याची खात्री झाल्यानंतर मी, त्यांनी व उपस्थित पंचांनी त्यावर सहया केल्या.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक म्हेत्रे साहेब यांनी मला कळविले की, माझ्या तक्रारीचे अनुषंगाने चालक अनिल सुरवसे यांची लाचेची मागणी आहे किंवा कसे? याबाबत त्यांची पंचासमक्ष तहसिल कार्यालय, कळंब येथे जावुन लाचमागणी पडताळणी करण्यात येणार असल्याबाबत खुलासा करुन लाचमागणी पडताळणी दरम्यान त्यांची लाचेची



Scanned with CamScanner

मागणी सिध्द झाल्यास लाचेचा सापळा आयोजीत करण्यात येईल असे सांगितले. तसेच त्यांनी दोन्ही पंचांची पंच म्हणुन काम करण्याची सहमती घेवुन बालाजी सोपान वाघमारे, कनिष्ठ लिपीक, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, धाराशिव यांची पंच क्रमांक 1 व आगतराव राजाराम राऊत, वरिष्ठ लिपीक, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, धाराशिव यांची पंच क्रमांक 2 म्हणुन नेमणुक केली.

त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव येथुन म्हेत्रे साहेब, नमुद दोन शासकीय पंच, सापळा पथक व मी असे माझ्याकडील खाजगी वाहनाने व म्हेत्रे साहेब यांचेकडील खाजगी वाहनाने निघुन कळंब येथे ढोकी रोडला असलेल्या मोहेकर कॉलेजच्या मैदानामध्ये सुरक्षित ठिकाणी जावुन थांबलो. तेथे म्हेत्रे साहेब यांनी मला कळविले की, चालक अनिल सुरवसे यांचे लाचमागणी पडताळणी दरम्यान व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार आहे. त्यानंतर त्यांनी पोना/शेवाळे यांना दिलेल्या सुचनेप्रमाणे पोना/शेवाळे यांनी काळ्या रंगाच्या बॅगमधुन व्हाईस रेकॉर्डर बाहेर काढुन त्याबाबत मला व दोन्ही पंचाना सविस्तर माहिती देवुन त्याचे प्रात्यक्षिक करुन दाखविले व एक नवीन मेमरी कार्ड व्हॉइस रेकॉर्डरमध्ये टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण रेकॉर्ड नसलेबाबत खात्री करुन दिली. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी माझे तसेच चालक अनिल सुरवसे यांचेत होणारे संभाषण व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्ड मध्ये रेकॉर्ड होणार असलेबाबत सांगितले.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी मला चालक अनिल सुरवसे यांची भेट कोठे होईल? या बाबत विचारले असता मी त्यांना चालक अनिल सुरवसे यांनी तहसिल कार्यालय, कळंब येथे बोलाविलेले असुन तेथेच त्यांची भेट होईल असे सांगितले. तेव्हा म्हेत्रे साहेब यांनी लाचमागणी पडताळणीच्या अनुषंगाने मला सुचना दिली की, मी चालक अनिल सुरवसे यांची तहसिल कार्यालय, कळंब येथे पंचासह जावून भेट घेवुन त्यांना आपले ट्रॅक्टरमधुन वाळु वाहतुक करुन देण्यासाठी व त्यावर कोणतेही कारवाई न करण्यासंदर्भाने बोलावे, दरम्यान त्यांनी लाचेची मागणी केल्यास त्यांच्याकडुन वेळ मागुन घेवुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत यावे. चालक अनिल सुरवसे हे तहसिल कार्यालय, कळंब हजर नसल्यास त्यांना फोन करुन स्पिकर ऑन करुन बोलावे. तसेच त्यांनी पंचांनाही सापळा कार्यवाहीच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर त्यांनी पोना/शेवाळे यांना दिलेल्या सुचनेप्रमाणे त्यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझे शर्टचे आतमध्ये डाव्या बाजुस बनियनला पिनने लावुन मला व पंच क्रं.1 वाघमारे यांना माझेकडील मोटारसायकल क्रमांक एम.एच. 25 AE 3897 ने चालक अनिल सुरवसे यांची भेट घेण्यासाठी रात्री 20.04 वा. रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच वाघमारे असे माझ्याकडील मोटारसायकलने तहसिल कार्यालय, कळंब येथे गेलो असता तेथे चालक अनिल सुरवसे हे न दिसल्याने आम्ही दत्त टायर पंम्चरच्या दुकानाजवळ जावुन मी चालक अनिल सुरवसे यांना माझा मोबाईल क्रमांक 9822954148 वरून त्यांच्या मोबाईल क्रमांक 9096206028 वर फोन करुन कुठाव असे म्हणुन विचारले असता त्यांनी करजंकरच्या पेट्रोल पंपावर पेट्रोल टाकत असल्याचे सांगितले. चालक अनिल सुरवसे यांचेत व माझेत फोनवर बोलणे झाल्यानंतर काही वेळाने ते त्यांचेकडील कारने आमचे जवळ आले. तेथे त्यांची व आमची भेट झाली. त्यावेळी चालक अनिल सुरवसे यांचेत व माझेत माझ्या ट्रॅक्टरमधुन वाळु वाहतुक करून देणे व त्यावर कोणतेही कारवाई न करण्या संदर्भात बोलणे झाले. त्यादरम्यान चालक अनिल सुरवसे यांनी माझ्याकडे प्रती महिना हप्ता म्हणुन 15,000/- रुपये लाच रक्कमेची मागणी करुन तडजोडी अंती दोन खेपाचे जेवढे होतील तेवढे दे ! असे म्हणून लाचेची मागणी केली व सदरची लाच रक्कम मी रात्री फिरुन आल्यावर फोन केल्यानंतर मला आणून दया असे म्हणाले. त्यानंतर मी व पंच वाघमारे असे त्यांचेपासुन निघुन माझेकडील मोटारसायकलने सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी येथे 20.45 वा. परत गेलोत.

त्यानंतर पोना/शेवाळे यांनी माझ्या जवळील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद करुन म्हेत्रे साहेबांकडे दिला. तेव्हा म्हेत्रे साहेब यांनी मला तेथे बाजुला जावुन थांबण्याची सुचना केल्याने मी तेथे बाजुला जावुन थांबलो. त्यानतर काही वेळाने म्हेत्रे साहेब यांनी मला त्यांचेजवळ बोलावुन घेवुन हकीकत विचारली असता मी त्यांना वरील प्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांचे सुचनेवरुन पोना/शेवाळे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामधील लाचमागणी संदर्भाने महत्वाचे संभाषण माझे व दोन्ही पंचासमक्ष ऐकले व संभाषणाबाबत मला व पंचांना विचारपुस केली. यावरुन चालक अनिल सुरवसे यांनी मला ट्रॅक्टर मधुन वाळु वाहतुक करुन देण्यासाठी व त्यावर कोणतीही कारवाई न करण्यासाठी माझ्याकडे प्रती महिना हप्ता म्हणुन 15,000/- रुपये लाच रक्कमेची मागणी करुन तडजोडी अंती दोन खेपाचे जेवढे होतील तेवढे दे ! असे म्हणून लाचेची मागणी केली व सदरची लाच रक्कम रात्री फिरुन आल्यावर फोन केल्यानंतर आणून देण्याचे सांगितल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर बराच वेळ झाला तरी चालक अनिल सुरवसे यांचा मला फोन आला नाही म्हणून मी त्यांना फोन केला, परंतू त्यांचा फोन लागला नाही. त्यामुळे म्हेत्रे साहेब यांनी माझ्याशी, पंचाशी व सापळा पथक यांचेशी विचारविनिमय करुन आम्हाला दिनांक 20.12.2023 रोजी सकाळी कळंब येथे येवुन चालक अनिल सुरवसे यांचेविरुध्द लाचेच्या सापळ्याचे आयोजन



Scanned with CamScanner

करण्यात येणार असल्याचे सांगून चालक अनिल सुरवसे यांचे लाचमागणी पडताळणी संदर्भात गोपनियता राखण्याबाबत व मला दिनांक 20.12.2023 रोजी 08:00 वा. कळंब येथे येरमाळा रोडला असलेल्या करंजकर यांचे पेट्रोल पंपाजवळ येवुन थांबणेस तसेच पंच सापळा पथक यांना 07:00 वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव येथे हजर येणेबाबत सुचना दिली.

म्हेत्रे साहेब यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे आज रोजी मी कळंब येथे येरमाळा रोडला असलेल्या करंजकर यांचे पेट्रोल पंपाजवळ आलो. त्यावेळी पेट्रोल पंपाचे बाजूला असलेल्या प्लॉटींगमध्ये सुरक्षित ठिकाणी म्हेत्रे साहेब, पंच व सापळा पथक असे त्यांचेकडील वाहनाने येथुन थांबलेले होते. मी त्यांचेजवळ गेल्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी कळविले की, चालक अनिल सुरवसे यांनी केलेल्या लाचमागणीप्रमाणे आज रोजी लाचेच्या नोटांना अॅन्थ्रासीन पावडर लावण्याची सापळापुर्व कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यावेळी मी म्हेत्रे साहेब यांना चालक अनिल सुरवसे यांनी हप्ता म्हणून दोन खेपाचे मागणी केल्याप्रमाणे 8,000/- रुपये होत असुन सदरची रक्कम त्यांना देण्यासाठी मी आणलेली आहे असे सांगितले. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांच्या सुचनेवरुन मी माझ्याजवळील सर्व रोख रक्कम व चिज वस्तु काढुन त्यांचेकडील वाहनाचे सिटवर ठेवले. मग त्यांनी अन्थ्रॉसीन पावडर लावणे, अन्थ्रॉसीन पावडरचे उपयोग, गुणधर्म व अल्ट्राव्हायलेट दिव्याचा उपयोग याबाबत आम्हास माहिती दिली. त्यानंतर त्यांचे सुचनेवरुन पोहेकॉ/ उगलमुगले यांनी मी चालक अनिल सुरवसे यांना देण्यासाठी आणलेल्या 500/- रुपये दराच्या 16 चलनी नोटांना अन्थ्रॉसीन पावडर लावुन त्या नोटांची त्यांचेकडील वाहनाच्या काचा व दरवाजे बंद करुन केलेल्या कृत्रीम अंधारात अल्ट्राव्हायोलेटच्या लॅम्पने तपासणी करुन त्याचे सविस्तर प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर सदर नोटांची घडी पोहेकॉ/ उगलमुगले यांनी माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशामध्ये अलगद ठेवुन दिली. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी चालक अनिल सुरवसे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर गळ्यातील गमज्या डाव्या हातात धरण्याबाबत ईशारा मला नेमुन दिला.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी मला, दोन्ही पंचाना व सापळा पथकातील सदस्यांना सविस्तर सुचना दिल्या व नंतर त्यांच्या सुचनेवरुन पोना/शेवाळे यांनी एक नवीन मेमरी कार्ड व्हॉइस रेकॉर्डरमध्ये टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण रेकॉर्ड नसलेबाबत खात्री करुन दिली व त्यांनी माझे व चालक अनिल सुरवसे यांचेत होणारे संभाषण व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्ड म मध्ये रेकॉर्ड होणार असलेबाबत सांगितले.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी मला चालक अनिल सुरवसे यांची भेट कोठे होईल? या बाबत विचारले असता मी त्यांना चालक अनिल सुरवसे यांची तहसिल कार्यालय, कळंब येथे भेट होईल असे सांगितले.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांचे सुचनेवरुन पोना/शेवाळे यांनी सदर व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझे शर्टचे आतमध्ये डाव्या बाजुस बनियनला पीनने लावुन मला व पंच क्र. 1 वाघमारे यांना माझेकडील मोटारसायकल क्रमांक एम.एच. 25 AE 3897 ने चालक अनिल सुरवसे यांची भेट घेण्यासाठी सकाळी 09:26 वा. रवाना केले. आमचे पाठोपाठ म्हेत्रे साहेब व सापळा पथक असे त्याचेकडील वाहनाने निघाले. मी व पंच वाघमारे असे तहसिल कार्यालय, कळंब येथे येवुन मोटारसायकल बाजुला लावुन चालक अनिल सुरवसे यांना पाहिले, परंतु ते न दिसल्याने मी त्यांना माझा मोबाईल क्रमांक 9822954148 वरुन त्यांच्या मोबाईल क्रमांक 9096206028 वर फोन करुन कुठायेत असे म्हणुन विचारले असता, ते मला मॅडमला आणायला चाललोय हित रेस्टहाऊसला असे म्हणाले. तेंव्हा मी त्यांना शिंदेच्या हॉटेलपशी असल्याचे सांगितले. त्यावर ते मला आलोच असे म्हणाले. त्यावरून मी व पंच वाघमारे असे शिंदे यांचे हॉटेल जवळच थांबलो.

त्यानंतर काही वेळाने चालक अनिल सुरवसे हे आमचे जवळ आले व आम्ही शिंदे यांचे चहाचे हॉटेल मध्ये गेलो. तेथे आम्ही चहा घेतला त्यादरम्यान चालक अनिल सुरवसे यांचेत व माझेत वाळु वाहतुक संदर्भाने व इतर बोलणे झाले. नंतर आम्ही हॉटेलच्या पाठीमागे तहसिल कार्यालयाचे आवारत गेलोत. तेथे चालक अनिल सुरवसे यांनी मला तुमचं ही करा असे म्हणुन पैसे बाबत हाताने ईशारा केला. तेंव्हा मी त्यांना दोन ट्रिपच केलयं असे म्हणुन माझ्या खिशातील 8,000/- रुपये लाचेची रक्कम उजव्या हाताने काढुन त्यांचे समोर धरली असता त्यांनी 8,000/- रुपये लाच रक्कम उजव्या हातात घेवून त्यांच्या अंगावरील पॅन्टचे समोरील उजव्या बाजुचे खिश्यात ठेवुन दिली. त्यावेळी मी मला नेमुन दिलेला इशारा केला ती वेळ साधारण: 09:55 वाजण्याची होती. त्याचवेळी तेथे म्हेत्रे साहेब, पंच क्रमांक 2 राऊत व सापळा पथकातील पोलीस अंमलदार हजर आले व त्यांनी चालक अनिल सुरवसे यांना ताब्यात घेतले. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांच्या सुचनेवरुन पोना/शेवाळे यांनी माझ्याजवळील व्हाईस रेकॉर्डर काढून घेवुन तो बंद केला व म्हेत्रे साहेब यांनी मला तेथे बाजुला जावुन थांबण्याची सुचना केली. त्यावरुन मी तेथे बाजुला जावुन थांबलो.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी तेथे पुढील कामकाज केले व नंतर काही वेळाने त्यांनी मला पोलीस ठाणे, कळंब येथे बोलावुन घेतले. मी पोलीस ठाणे, कळंब येथे आल्यानंतर त्यांनी पोलीस ठाणे, कळंब येथील एका रुमच्या खिडक्या, दरवाजे व लाईट बंद करुन कृत्रीम अंधार करुन कृत्रीम अंधारात माझ्या हातांची व अंगावरील पॅन्टच्या समोरील



Scanned with CamScanner

उजव्या बाजुच्या खिशाची अल्ट्राव्हायलेट लॅम्पव्दारे तपासणी केली असता माझे उजवे हाताचे बोटाचे पेज्यावर व पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशावर व आतील बाजुस ठिक ठिकाणी अन्थ्रॅसीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी आम्हा सर्वासमक्ष चालक अनिल सुरवसे यांना त्यांचे संपुर्ण नावाबाबत विचारपुस केली असता त्यांनी त्यांचे नाव अनिल शिवराम सुरवसे, वय 54 वर्षे, व्यवसाय- नोकरी, वाहन चालक तहसिल कार्यालय, कळंब (वर्ग-3), मुळ रा. पाटोदा ता.जि.धाराशिव, सध्याचा पत्ता- झिंगाडे प्लॉट, लोहारा जि.धाराशिव व वकील कॉलनी, कल्पना नगर, कळंब जि. धाराशिव येथे अशोक शिंपले यांचे घरी किरायाने असे असल्याचे सांगितले.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी दोन्ही पंचा समक्ष मला चालक अनिल सुरवसे यांना पौसे देण्यासाठी रवाना केले पासुन ते ईशारा करेपर्यंत घटनाक्रम सांगावा अशी विचारणा केली असता, मी त्यांना वरील प्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर म्हेत्रे साहेब व पंचानी व्हाईस रेकॉर्डर मधील रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले.

एकंदरीत काल दिनांक 19.12.2023 रोजी अनिल शिवराम सुरवसे, वय 54 वर्षे, व्यवसाय- नोकरी, वाहन चालक तहसिल कार्यालय, कळंब (वर्ग-3), मुळ रा. पाटोदा ता.जि.धाराशिव, सध्याचा पत्ता- झिंगाडे प्लॉट, लोहारा जि.धाराशिव व वकील कॉलनी, कल्पना नगर, कळंब जि. धाराशिव येथे अशोक शिंपले यांचे घरी किरायाने यांनी मला ट्रॅक्टर मधुन वाळु वाहतुक करुन देण्यासाठी व त्यावर कोणतीही कारवाई न करण्यासाठी माझ्याकडे प्रती महिना हप्ता म्हणुन 15,000/- रुपये लाच रक्कमेची मागणी करुन तडजोडी अंती दोन खेपाचे 8,000/- रुपये लाचेची मागणी केली व आज दिनांक 20.12.2023 रोजी 8,000/- रुपये लाच रक्कम त्यांनी स्वत: स्विकारल्याने त्यांना पकडण्यात आले आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी मी माझी फिर्याद देत असुन सदरची फिर्याद संगणकावर टंकलिखीत करुन त्यांची प्रिंट काढुन मला वाचण्यास दिली ती मी वाचुन पाहिली, माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

( सिध्दाराम म्हेत्रे )
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SURESH NAMDEVRAO SABALE(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

S.S. [signature]

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SURESH NAMDEVRA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

[signature]
पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे, कळंब
जि.धाराशिव

Scanned with CamScanner